मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अन् त्यांच्या काळजाचा ठोका चुकला...!

## वाकडच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये अग्निशमन विभागाची मॉक ड्रिल

**पिंपरी | प्रतिनीधी**

दुपारी साडेअकरा वाजता अचानक हॉटेलच्या लॉबीत धूर पसरू लागला. अग्निबजावणीच्या सूचना सुरू झाल्या, काही क्षणातच सायरनचा आवाज कानठळ्या बसवू लागला... पाहता पाहता कर्मचाऱ्यांनी पाहुण्यांना बाहेर काढायला सुरुवात केली, आणि उपस्थितांचे काळजाचे ठोके क्षणभरासाठी थांबले. पण ही कुठलीही खरी आग नव्हती.तर ही होती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाने आयोजित केलेली मॉक ड्रिल.



रहाटणी उपअग्निशमन केंद्राच्या वतीने वाकडमधील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये ही मॉक ड्रिल पार पडली. शहरातील वाढत्या उंच इमारती व गर्दीच्या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत काय करावे, याचा सराव करून देण्यासाठी हा प्रयोग करण्यात आला होता.

या मॉक ड्रिलमध्ये धुराने भरलेल्या भागातून सुटका, अग्निशामक सिलिंडरचा योग्य वापर, लिफ्ट न वापरता जिन्यांचा वापर, तसेच आपत्तीच्या क्षणी शांत राहून तात्काळ निर्णय घेण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. हॉटेलमधील कर्मचारी, व्यवस्थापन आणि पाहुण्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला.

सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सरावात प्रभारी उपअग्निशमन अधिकारी विजय घुगे, उपअग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांच्यासह अग्निशमन दलाचे अधिकारी, जवान आणि शिकाऊ कर्मचारी सहभागी झाले होते.

प्रभारी अधिकारी विजय घुगे म्हणाले, "या सरावामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. आपत्ती व्यवस्थापनात त्वरित निर्णय घेणे व घाबरून न जाता कृती करणे, हेच यशस्वी टप्पे आहेत."

> अग्निदुर्घटना कधीही, कुठेही होऊ शकते. अशा वेळी वेळ वाचवून घेतलेली कृतीच जीव वाचवते. मॉक ड्रिलद्वारे आम्ही केवळ सराव घडवत नाही, तर मानसिक तयारीही करून देतो.
>
> **- उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त,
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर; आरोग्याचा प्रश्न गंभीर

## महापालिका प्रशासनाने ही समस्या तत्काळ मार्गी लावावी अशी नागरिकांची मागणी

**पिंपरी | प्रतिनीधी**

परिसरातील आरकेएच सोसायटी समोर ड्रेनेजपाणी रस्त्यावर येत असल्याने परिसरातील नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. डासोत्पत्तीमुळे विविध आजारांचा सामना नागरिकांना करावा लागतो आहे. महापालिका प्रशासनाने ही समस्या तत्काळ मार्गी लावावी अशी मागणी करण्यात येत आहे.

बीआरटी रोडवर जीवन हॉटेल शेजारील आरकेएच इमारतीसमोर मागील काही दिवसांपासून ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर येते आहे. दुषित अन् दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे



> या ठिकाणी आजच पाहणी दौरा केला आहे. पावसामुळे त्या ठिकाणी ओव्हरफ्लो झाले आहे. पाऊस बंद झाल्यानंतर त्या ठिकाणी दुरुस्ती केली जाईल.
>
> **- प्रियंका म्हस्के,
> ड्रेनेज विभाग इ प्रभाग.**

> ड्रेनेजचे दुषित पाणी रस्त्यावर ओव्हरफ्लो झाले आहे. त्या ठिकाणाहून ये-जा करणाऱ्या नागरिकांना आजुबाजूला राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे तिथे राहणे नागरिकांना मुश्किल झाले आहे. प्रशासनाने तत्काळ ड्रेनेज समस्या मार्गी लावावी.
>
> **- गणेश सस्ते,
> शिवयोध्दा ग्रुप.**

आजुबाजूच्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. हिरवे अन् अळ्या असलेले पाणी, त्यावर किडे, डास याचा सामना नागरिकांना करावा लागला.

# नागरिकांनी सुचविले 5,102 विकासकामे

## महापालिकेच्या 'अर्थसंकल्पात नागरी सहभाग' उपक्रमाला नागरिकांकडून विक्रमी प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'अर्थसंकल्पात नागरी सहभाग' उपक्रमाला नागरिकांकडून विक्रमी प्रतिसाद मिळाला. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पासाठी तब्बल पाच हजार १०२ नागरिकांनी अभिप्राय नोंदविला आहे. गेल्या वर्षी दोन हजार २७९ नागरिकांचे अभिप्राय प्राप्त झाले होते.

महापालिकेने १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत 'अर्थसंकल्पात नागरी सहभाग' उपक्रम राबविला. शहरातील सर्व आठ क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रातील रहिवाशांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. 'ड' क्षेत्रीय कार्यालय स्तरावर सर्वाधिक एक हजार १६१ अभिप्राय प्राप्त झाले आहेत. नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या




मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद केली जाते. यामध्ये रस्ते विकास, घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा सुधारणा, उद्याने, पावसाच्या पाण्याचा निचरा आणि सार्वजनिक सोयीसुविधा यांचा समावेश असतो.

**नागरिकांनी सूचविलेली कामे**

काम / संख्या
रस्ते / १,२६५
कचरा व्यवस्थापन / ५९८
पाणीपुरवठा / ४५८
उद्याने, मैदाने / ४०४
पावसाळी पाण्याचा निचरा / ३०७
सार्वजनिक स्वच्छतागृह / ३०३

> अर्थसंकल्पात नागरी सहभाग उपक्रमामध्ये पाच हजारांहून अधिक नागरिकाचा प्रतिसाद मिळणे, हे पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या नागरी सहभागाचे प्रतीक आहे. नागरिकांच्या या सूचनांमुळे २०२६-२७ चा अर्थसंकल्प अधिक प्रतिसादक्षम आणि समावेशक तयार करण्यास मदत होईल. नागरिकांच्या सूचनांचे तांत्रिक परीक्षण करून त्यानंतर मंजूर कामांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल. त्यांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात येईल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

**क्षेत्रीय कार्यालयनिहाय नागरिकांचे अभिप्राय**

| कार्यालय / अभिप्राय |
|---|
| अ / ६३५ |
| ब/७५५ |
| क / ५७८ |
| ड/ ११६१ |
| ई/५७९ |
| ग/४८८ |
| ह/४१४ |
| ४९२/४९२ |

# पिंपरी चिंचवडकरांना अनुभवता येणार "रंगानुभूति"

## 19 ते 21 सप्टेंबर ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे नाट्य प्रयोगकला महोत्सवाचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि थिएटर वर्कशॉप कंपनी व पैस कल्चरल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने “रंगानुभूति: पूर्वरंग ते उत्तररंग नाट्य प्रयोग कला महोत्सव २०२५” चे आयोजन १९ ते २१ सप्टेंबर पर्यंत ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, प्राधिकरण निगडी येथे करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी (दि.१९) सायंकाळी पाच वाजता प्रसिद्ध चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व महोत्सवाचे अध्यक्ष जब्बार पटेल हे असून, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह तथा प्रशासक आणि महोत्सवाचे निमंत्रक यांच्या शुभहस्ते होणार आहे.

यानंतर सात वाजता कर्नाटक श्री. इदागुणजी महागणपती यक्षगान मंडळी केरेमाने कर्नाटक यांचे पंचवटी ही कथानाट्य असलेली – यक्षगान प्रयोगकला सादर होईल आणि सादरीकरणावर चर्चासत्र होईल अशी माहिती संयोजक व पैस रंगमंच चे संस्थापक प्रभाकर पवार यांनी मंगळवारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

तत्पूर्वी सकाळी सात ते दुपारी एक वाजेपर्यंत, पैस रंगमंच, चिंचवड पैस करंडक अंतर्गत शालेय नाट्यछटा आणि एकपात्री अभिनय स्पर्धा होईल. तसेच ग. दि. माडगूळकर नाट्यगृहाच्या निकट रंगमंचावर खुल्या गटाच्या मूकनाट्य, लघुनाटिका स्पर्धा होतील. सकाळी ९:३० वाजता, संस्कार भारती आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड यांच्या सहयोगाने प्रदर्शन विभागात “चित्रकला प्रदर्शन” तर साहित्यिक श्रीकांत चौघुले यांच्या मार्गदर्शनाने पिंपरी चिंचवडच्या सांस्कृतिक जडणघडणीचा वारसा” उलगडणारे “रंगदर्शन” या प्रदर्शनाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात येईल. सकाळी १० ते १२,




ग. दि. माडगूळकर नाट्यगृहाच्या कॉन्फरन्स हॉल येथे कर्नाटक येथील यक्षगान मंडळींचे यक्षगानावर प्रयोगकला अभ्यासवर्ग – कार्यशाळा होईल. तर दुपारी २ ते ४ या वेळात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पंडित भीमसेन जोशी अकादमीचे पूर्वरंग (नांदी,नाट्यगीते व शास्त्रीय गायन) असे कार्यक्रम होतील.

या तीन दिवसीय महोत्सवात पैस करंडक स्पर्धेत नाट्यछटा, एकपात्री अभिनय, लघु नाटिका, मूकनाट्य व पथनाट्य स्पर्धा तर महोत्सवात रसिकांसाठी मराठी, हिंदी, कन्नड नाटकांसह चित्रकला प्रदर्शन व शहराचा सांस्कृतिक वारसा मांडणारे रंगदर्शन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अमृता ओंबळे यांनी दिली.

शनिवारी (दि. २० सप्टेंबर) सायंकाळी पाच वाजता, पिंपरी चिंचवड परिसरात नाट्यकलेसह सांस्कृतिक क्षेत्रात योगदान असणाऱ्या संस्थांचा “प्रयोगकला सन्मान” हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. यावेळी एनसीपीएच्या राजश्री शिंदे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ललित कला केंद्र, विभाग प्रमुख प्रवीण भोळे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. यानंतर सायंकाळी सात वाजता, एनसीपीए मुंबई आणि नाशिक येथील सपान संस्थेचे “कलगीतुरा” हे मराठी नाटक सादरीकरण आणि त्यावर चर्चासत्र होईल. तत्पूर्वी सकाळी सात ते अकरा वाजेपर्यंत, नाट्यगृह परिसरात महाविद्यालयीन व खुल्या पथनाट्य स्पर्धा होतील. यानंतर मुख्य रंगमंचावर दुपारी बारा वाजता, जयपूर राजस्थान येथील रंग मस्ताने संस्थेचे “महारथी” या फिजिकल थिएटर माध्यमातून हिंदी नाटकाचे सादरीकरण आणि त्यावर चर्चासत्र होईल.

रविवारी (दि.२१ सप्टेंबर) सायंकाळी पाच वाजता, एफटीआयचे माजी विभाग प्रमुख प्रा. समर नखाते यांचा ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांच्या हस्ते “रंगानुभूति: सन्मान” देऊन गौरव करण्यात येणार आहे. यानंतर जेष्ठ नाटककार सतीश आळेकर लिखित आणि प्रसिद्ध नाट्य कलाकार सुव्रत जोशी आणि गिरिजा ओक यांची भूमिका असलेले राखाडी स्टुडिओ व बी बिरबल निर्मित “ठकीशी संवाद” या मराठी नाटकाचे सादरीकरण आणि त्यावर चर्चासत्र होईल. तत्पूर्वी सकाळी दहा वाजता नाट्यगृहातील कॉन्फरन्स हॉल येथे रंग मस्ताने संस्था राजस्थानच्या कलावंतांच्या वतीने “फिजिकल थिएटर” आयोजित अभ्यासवर्ग – कार्यशाळा होईल. दुपारी १२:३० वाजता गदिमा नाट्यगृहातील निकट रंगमंचवर राजस्थानच्या अक्षय गांधी आणि कलाकारांचे ” एकलनाट्य कावडकथा – “माया” या हिंदी भाषेतील नाटकाचे सादरीकरण आणि त्यावर चर्चासत्र होईल. दुपारी दोन वाजता, मराठी रंगभूमीची १७५ वर्षांच्या गौरव गाथा मांडणारा महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन, मुंबईच्या वतीने निर्मित “उत्तररंग – एक खंड” च्या लेखिका वंदना घांगुर्डे यांची श्रीकांत चौगुले हे प्रकट मुलाखत घेणार आहेत.

# पुण्यात गुरुवारी पाणीपुरवठा राहणार बंद

## शहरातील विविध भागातील पाण्याच्या टाक्यांची विद्युत विषयक व पंपिंग विषयक कामे केली जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या तीन दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातून पाणी सोडले जात आहे. मात्र उद्या (गुरुवारी) १८ सप्टेंबरला अनेक भागातील पाणीपुरवठा बंद ठेवला जाणार आहे. पाणीपुरवठा न होणाऱ्या भागांची यादी देखील महापालिकेने जाहीर केली आहे.



महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने शहरातील विविध भागातील पाण्याच्या टाक्यांची विद्युत विषयक व पंपिंग विषयक कामे केली जाणार आहेत. ही तातडीची देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी बहुतांश भागातील पाणीपुरवठा बंद राहणार आहे. या कामांमुळे शुक्रवारी ( १९ सप्टेंबरला) सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

दुरुस्तीच्या कामासाठी पाणीपुरवठा बंद राहणाऱ्या भागांची यादी पाणीपुरवठा विभागाने जाहीर केली आहे. यामध्ये पुढील भागांचा समावेश आहे.

**वडगाव जलकेंद्र परिसर :**

हिंगणे, आनंदनगर, वडगाव, धायरी, आंबेगाव पठार, दत्तनगर, धनकवडी, कात्रज, भारती विद्यापीठ परिसर, कोंढवा बुद्रुक, आंबेगाव खुर्द, आंबेगाव बुद्रुक, येवलेवाडी, सहकारनगर भाग २ वरील भाग, आंबेडकरनगर, टिळकनगर परिसर, दाते बस स्टॉप परिसर.

**पर्वती एचएलआर टाकी परिसर :**

सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणीनगर, लेकटाउन, शिवतेजनगर, अप्पर व लोअर इंदिरानगर, शेळके वस्ती, महेश सोसायटी, बिबवेवाडी गावठाण लगतचा परिसर.

**चांदणी चौक परिसर :**

भूगाव रस्ता परिसर, संपूर्ण बावधन, दोन्ही भुसारी कॉलनी व लगतचा भाग, गुरू गणेशनगर, सूरजनगर, संपूर्ण बावधन, न्यू लक्ष्मीनगर, परमहंसनगर, संपूर्ण पाषाण, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी, निम्हणमळा, लमाणतांडा, मोहननगर, सूस रस्ता.

**राजीव गांधी पंपिंग :**

सच्चाई माता टाकी, संतोषनगर, दत्तनगर, आंबेगाव बुद्रुक, आंबेगाव खुर्द, सुंदामाता नगर, वंडर सिटी, मोरेबाग, श्रीहरी टाकी, बालाजी नगर, पवार हॉस्पिटल परिसर, केदारेश्वर टाकी, सुखसागरनगर (काही भाग) राजस सोसायटी, उत्कर्ष सोसायटी, कात्रज गावठाण, येवलेवाडी परिसर.

**वारजे जलकेंद्र :**

बाणेर, बालेवाडी, बाणेर गावठाण, चाकणकर मळा, पॅनकार्ड क्लब रस्ता, पल्लोड फार्म, शिंदे पारखे वस्ती, विधाते वस्ती, मेडिपॉईंट रोड, विजयनगर, आंबेडकरनगर, दत्तनगर.

**गांधी भवन टाकी परिसर :**

काकडे सिटी, हिंगणे होम कॉलनी, सिप्ला फाउंडेशन, हिल व्ह्यू गार्डन, पॉप्युलरनगर, वारजे माळवाडी परिसर, गोकुळनगर,महात्मा सोसायटी परिसर, भुजबळ टाउनशिप, एकलव्य परिसर, कुमार परिसर, कोथरूड क्षेत्रीय कार्यालय परिसर, श्रावणधारा, सहजानंद (भाग), शांतीबन गांधी स्मारक, किर्लोस्कर कंपनी, लक्ष्मीनगर, बाह्यबळण रस्ता दोन्ही बाजू, श्रीराम सोसायटी, गिरीष सोसायटी, तिरुपतीनगर, कर्वेनगर गावठाण, तपोधाम, रामनगर, गोसावी वस्ती, कॅनॉल रस्ता.

**एसएनडीटी परिसर :**

गोखलेनगर, शिवाजीनगर, मॉडेल कॉलनी, रेव्हेन्यू कॉलनी, कोथरूड संपूर्ण भाग, रामबाग कॉलनी, हनुमाननगर, केळेवाडी, गुजरात कॉलनी, गाढवे कॉलनी, ज्ञानेश्वर कॉलनी, आयडियल कॉलनी, वडारवाडी, सेनापती बापट रस्ता, जनवाडी, वैदूवाडी, भोसलेनगर, अशोकनगर, खैरेवाडी, शिवाजी हाउसिंग सोसायटी, भांडारकर रस्ता, प्रभात रस्ता, हनुमाननगर, जनवाडी, वैदुवाडी, वडारवाडी, पोलिस लाइन, संगमवाडी.

**वारजे जलकेंद्र जीएसआर टाकी परिसर :**

कर्वेनगर गावठाण परिसर, तपोधाम सोसायटी, शाहू कॉलनी गल्ली क्र. १ ते ११. इंगळेनगर, वारजे जकात नाका परिसर, कर्वेनगर कॅनॉल गल्ली क्र. १ ते १०, शिवणे औद्योगिक परिसर

जुने वारजे जलकेंद्र भाग :

रामनगर, अहिरेगाव, माळवाडी, सहयोगनगर, गोकुळनगर, विठ्ठलनगर, ज्ञानेश सोसायटी, यशोदीप चौक, मामासाहेब मोहोळ शाळा परिसर, अमर भारत सोसायटी, गणपती माथा परिसर, एनडीए रस्त्याचा काही भाग, पॉप्युलर कॉलनी.

**नवीन व जुने होळकर जलकेंद्र पंपिंग भाग :**

मुळा रोड, खडकी कॅन्टोन्मेंट संपूर्ण परिसर, एमईएस, हाय एक्स्प्लोझिव्ह फॅक्टरी, हरीगंगा सोसायटी.

**पाषाण पंपिंग व सूस गोल टाकी परिसर :**

गणराज चौक, पॅनकार्ड रोड, वीरभद्रनगरचा काही भाग, समर्थ कॉलनी.

# रिंग रोडच्या भूसंपादन प्रक्रियेचा महानगर आयुक्तांनी घेतला आढावा

## टप्पा एक, दोन, तीन आणि चारसंदर्भात सुरू असलेल्या कार्यवाहीबाबत आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

प्रस्तावित रिंग रोडच्या भूसंपादन प्रक्रियेसंबंधी सुरू असलेल्या कार्यवाहीचा पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी प्रशासकीय यंत्रणांकडून आढावा घेतला. टप्पा एक, दोन, तीन आणि चारसंदर्भात सुरू असलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेऊन तातडीने भूसंपादन प्रक्रिया आणि मोजणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.




पुणे शहर आणि परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांमार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहे. यात प्रामुख्याने प्रस्तावित रिंग रोडसह इतर महत्त्वाचे काही रस्ते रुंदीकरणाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. रिंग रोड टप्पा एक, दोन, तीन आणि चार असे असून सद्यस्थितीत टप्पा क्रमांक एक सोलू ते निरगुडीमधील ३ गावांची भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. संबंधित शेतकऱ्यांना एफएसआय / टीडीआर देण्याच्या अनुषंगाने तातडीने संबंधित शेतकऱ्यांसोबत बैठका आयोजित करण्याचे निर्देश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले.

> या बैठकीला पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक अविनाश पाटील, जमीन व मालमत्ता विभागाचे सह आयुक्त हिम्मत खराडे, भूमिअभिलेख विभागाच्या अधीक्षक आशा जाधव, अधीक्षक अभियंता शिवप्रसाद बागडी, भूसंपादन समन्वय अधिकारी, पुणे महानगरपालिका, एनएचएआय, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्यासह इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.
>
> **- डॉ. ज्ञानेश्वर भाले, जनसंपर्क अधिकारी, पीएमआरडीए**

हिंजवडी व चाकण भागातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रस्तावित रस्त्याच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत माहिती जाणून घेतली. नवले ब्रीज परिसरातील वाहतूक व्यवस्थापनासाठी भूसंपादन, जलवाहिनीचे स्थलांतर व सिग्नल यंत्रणा बसविण्याबाबतची सद्यस्थिती जाणून घेण्यात आली. संबंधित विभागांनी समन्वयातून ऑक्टोबरपर्यंत कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

# जुन्नर तालुक्यातील रस्त्यांना कायदेशीर ओळख

## जुन्नर तालुक्यातील सर्व रस्त्यांची नोंद घेऊन त्यांना भू-सांकेतिक क्रमांक देण्याची प्रक्रिया सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील सर्व रस्त्यांची नोंद घेऊन त्यांना भू-सांकेतिक क्रमांक देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या उपक्रमाचा पहिला प्रयोग जुन्नर तालुक्यातील मौजे बोरी बुद्रुक येथे यशस्वी करण्यात आला. त्यामुळे बोरी बुद्रुक गाव रस्त्यांना सांकेतांक देवून जीआयएस नकाशावर स्थान देणारे राज्यातील पहिले गाव ठरले.

ग्रामपंचायत, महसूल यंत्रणा आणि ग्रामस्थ यांच्या लोकसहभागातून काढलेल्या शिवार फेरीत आधीच नकाशावर असलेले पाच रस्ते आणि नव्याने निश्चित झालेले ६९ पाणंद, शेतरस्ते, शिवरस्ते आणि वहिवाटीचे रस्ते यांचा समावेश करण्यात आला. एकूण ७४ रस्त्यांना भू-सांकेतिक क्रमांक देऊन त्यांची ग्रामसभेत मंजुरी घेण्यात आली. त्यानंतर महसूल आणि भूमिअभिलेख विभागाच्या संयुक्त पथकाने या सर्व रस्त्यांचे सीमांकन करून जीआयएस प्रणालीद्वारे नकाशावर नोंद केल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

या प्रक्रियेत गाव नकाशांवर असलेले आणि प्रत्यक्षात अस्तित्वात असलेले सर्व प्रकारचे रस्ते नोंदवले जाणार आहेत. यात ग्रामीण रस्ते, हद्दीचे रस्ते, पायमार्ग, शेतरस्ते, वहिवाटीचे रस्ते यांचा समावेश असेल. रस्त्याची लांबी, रुंदी, सुरुवात-शेवट, किती शेतकरी त्याचा वापर करतात, कोणत्या गटातून रस्ता जातो याचा तपशील त्यासाठी देणे बंधनकारक असणार आहे. ही सर्व माहिती माहिती १७ सप्टेंबरपासून प्रत्येक गावातील ग्रामसभेत ठेवली जाणार असून ग्रामसभेची मंजुरी घेणे अनिवार्य असेल. अतिक्रमित किंवा बंद रस्त्यांबाबत मंडळ स्तरावर रस्ता समितीच्या उपस्थितीत 'रस्ता अदालत' घेऊन निर्णय दिला जाणार आहे.



### जीआयएस प्रणालीद्वारे नकाशावर नोंदणी

» ग्रामसभेत मंजूर झालेल्या रस्त्यांना भू-सांकेतिक क्रमांक देऊन उपाधीक्षक भूमिअभिलेख कार्यालयास माहिती दिली जाणार आहे. त्यानंतर जीआयएस प्रणालीद्वारे नकाशावर अक्षांश-रेखांशासह नोंदणी होईल. परिणामी गावनिहाय नमुना १ (फ) मध्ये रस्त्यांना अधिकृत आणि कायदेशीर अभिलेख प्राप्त होणार आहे.

# सरकारी कार्यालयांकडे 342 कोटींची पाणीपट्टी थकीत

## पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड, रेल्वे प्रशासन आणि ससून रुग्णालय यांसारखे सरकारी विभाग मोठे थकबाकीदार

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिका हद्दीतील केंद्र व राज्य शासनाच्या विविध कार्यालयांनी महापालिकेची तब्बल ३४२ कोटी रुपयांची पाणीपट्टी थकविली असल्याचा आरोप सजग नागरिक मंचाने केला आहे. पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड, गॅरिसन इंजिनीअर्स, रेल्वे प्रशासन, ससून रुग्णालय, येरवडा कारागृह हे प्रमुख थकबाकीदार असून, टपाल, बीएसएनएल, पोलीस आणि शिक्षण खाते यांच्याकडेदेखील थकबाकी असल्याचा दावा मंचाने केला आहे.


सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी माहितीच्या अधिकारात मिळविलेल्या माहितीवरून हे निदर्शनास आले आहे. 'महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी ही कोट्यवधी रुपयांची थकबाकी वसूल करण्यासाठी कडक पावले उचलावीत,' अशी मागणी वेलणकर यांनी केली आहे.

'पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड, गॅरिसन इंजिनीअर्स, रेल्वे प्रशासन, ससून रुग्णालय, येरवडा कारागृह हे प्रमुख थकबाकीदार असून, टपाल, बीएसएनएल, पोलीस आणि शिक्षण खाते यांच्याकडेदेखील लाखो रुपयांची थकबाकी आहे,' असे वेलणकर यांनी सांगितले.

'सर्वसामान्य नागरिकांनी त्यांची पाणीपट्टी अथवा मिळकतकर मुदतीत न भरल्यास महापालिका प्रशासन त्यावर दंड आकारून थकबाकीची वसुली करते. मग हा न्याय केंद्र, तसेच राज्य सरकारच्या कार्यालयांना का लागू केला जात नाही? त्यांच्याकडून दंडासह पाणीपट्टी कधी वसूल होणार,' अशी विचारणा वेलणकर यांनी केली आहे.

'थकबाकीदार असलेल्या राज्य, तसेच केंद्राच्या कार्यालयातील प्रमुख अधिकाऱ्यांची पाणीपुरवठा विभागाला बैठक घेण्याची सूचना करून महापालिका आयुक्तांनी ही रक्कम वसूल करावी. यामुळे महापालिकेच्या विकासकामांना निधीदेखील उपलब्ध होणार आहे,' असेही वेलणकर यांनी स्पष्ट केले.




### थकबाकीदार सरकारी कार्यालये

- » पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड : सुमारे ४० कोटी
- » गॅरिसन इंजिनीअर्स : सुमारे ५० कोटी
- » रेल्वे प्रशासन : सुमारे ४५ कोटी
- » ससून रुग्णालय : सुमारे ८ कोटी
- » येरवडा कारागृह : सुमारे ७ कोटी

“ सर्वसामान्य नागरिकांना एक न्याय आणि सरकारी कार्यालयांना वेगळा न्याय असे होता कामा नये. महापालिकेने केंद्र, तसेच राज्य सरकारी कार्यालयांकडे असलेली पाणीपट्टीची थकबाकी तातडीने वसूल करावी. यामुळे महापालिका कोणाच्या बाबतीतही दुजाभाव करत नाही, हे सिद्ध होईल.

**- विवेक वेलणकर,**
**अध्यक्ष सजग नागरिक मंच.**